**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यमान विनाअनुदानित संस्थांमध्ये सध्या सुरू असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, तुकडी पुर्ण करणे इ. साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या परवानगीस अनुसरून शासन मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२०/(प्र.क्र.४७/२०)तांशि-५**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १४ ऑगस्ट, २०२०.

**संदर्भ :** संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/एआयसीटीई/मान्यता/२०२०/४०१, दिनांक ०८.०७.२०२०.

**प्रस्तावना :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील विनाअनुदानित संस्थांमध्ये सध्या सुरू असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, तुकडी पुर्ण करण्यास मान्यता दिलेली आहे. सोबत जोडलेल्या Annexture A मध्ये नमुद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सध्या सुरू असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, तुकडी पुर्ण करण्यास शासन मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या Annexture A, मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सध्या सुरू असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पुर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पुर्ववत करणे, तुकडी पुर्ण करण्यास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

ATTESTED
Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

३. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

५. नव्याने मान्यता देण्यात आलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

६. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

७. सदर व्यावसायीक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

८. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ व त्याच्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे नियम तथा आदेश संबंधित संस्थांना लागु राहतील.

९. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

ATTESTED
Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

१०.संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

११.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१२.यापूर्वी ज्या संस्थांमध्ये नियमित पाळी, प्रथम पाळी , द्वितीय पाळी / पार्ट टाइम अभ्यासक्रम राबविले जात होते असे अभ्यासक्रम आता एकूण प्रवेश क्षमतेमध्ये एकत्रित करण्यात आले असुन अशा संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदने प्रसिद्ध केलेल्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२०-२१ मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार, एकूण प्रवेश क्षमतेसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, शिक्षक वर्ग आणि इतर आवश्यकता या सर्व सुविधा पूर्ण कराव्या लागतील. तसेच अभिमत विद्यापीठे मानल्या जाणाऱ्या संस्था / ऍक्रिडिटेशन प्राप्त संस्था / स्वायत्त दर्जा असणारी संस्था यांनी ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुकमध्ये नमूद केल्यानुसार शिक्षक व विद्यार्थी यांचे गुणोत्तर राखणे आवश्यक आहे. अशा सर्व संस्था / विद्यापीठांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, आवश्यक शिक्षक वर्ग, पायाभूत सुविधा आणि इतर सुविधा अशा मानदंडांची पूर्तता २ वर्षांच्या आत निर्माण कराव्या लागतील.

१३.सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

१४.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१५.अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे/अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काही परिस्थीती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील. याप्रमाणे तसे हमीपत्र संबंधित संस्थांनी द्यावयाचे आहे.

१६.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१७.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००८१४११३७५३६१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: CN = Anil Raghunath Katkar, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Higher & Technical Education Department
Date: 2020.08.14 11:48:46 +05'30'

(अ.र.काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
३. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सर्व संबंधित संस्था, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,

ATTESTED
Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

९. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१,

१०. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली,

११. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई,

१२. निवड नस्ती/तांशि-५.

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

Annexure A

List of Increase in Intake for Diploma Engineering courses-New Course/ Increase in Intake/ Restoration in Intake approved by AICTE for A.Y. 2020-21

**Private-Self Financing [Unaided] Polytechnics**

| Sr No. | Institute Code | Institute Name | Institute Address | District | Institution Type | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2019-20 | Intake Approved for 2020-21 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 43 | 4245 | SHRI MUKUNDRAO PANNASE POLYTECHNIC | K.NO 42, PH.62 AT MAUZA MONDHA, PANJARI, HINGANA, NAGPUR. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER TECHNOLOGY | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 44 | 4245 | SHRI MUKUNDRAO PANNASE POLYTECHNIC | K.NO 42, PH.62 AT MAUZA MONDHA, PANJARI, HINGANA, NAGPUR. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRONIC ENGINEERING | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 45 | 4245 | SHRI MUKUNDRAO PANNASE POLYTECHNIC | K.NO 42, PH.62 AT MAUZA MONDHA, PANJARI, HINGANA, NAGPUR. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 46 | 4245 | SHRI MUKUNDRAO PANNASE POLYTECHNIC | K.NO 42, PH.62 AT MAUZA MONDHA, PANJARI, HINGANA, NAGPUR. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MECHANICAL ENGINEERING | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 47 | 4608 | V J POLYTECHNIC | AT- KHAMONA, TAH.- RAJURA, DIST.- CHANDRAPUR | CHANDRAPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MINING & MINE SURVEYING | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 48 | 5240 | GURU GOBIND SINGH POLYTECHNIC, NASHIK | KHALSA EDUCATIONAL COMPLEX, WADALA PATHARDI ROAD,GURU GOBIND SINGH MARG, NASHIK - 9 | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER ENGINEERING | 90 | 120 | 30 | EoA Only |
| 49 | 5254 | SUNSUBA POLYTECHNIC | AT-LAXMINAGAR,POST-MUNDEGAON,TAL-IGATPURI,DIST-NASHIK 422403 | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | CIVIL ENGINEERING | 54 | 60 | 6 | EoA Only |

**ATTESTED**

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik